


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

• वर्ष : ०३ • अंक : ११२ • पुणे • शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



पुण्यात 'युती-आघाडी' कागदावरच

3




सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार : दोडके

4

## ठळक बातम्या

### धायरीच्या शिरपेचात मानाचा तुरा

पुणे (आरंभ पर्व) : उत्तर प्रदेशातील मथुरा येथे पार पडलेल्या पहिल्या राष्ट्रीय ड्रिपबॉल अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र राज्याने ऐतिहासिक विजय मिळवत विजेतेपद पटकावले आहे. ड्रिपबॉल संघाचे नेतृत्व पुण्याच्या धायरी भागातील एका सर्वसामान्य कुटुंबातील तरुण, कु. प्रथमेश प्रशांत जाधव याने केले, ज्यामुळे धायरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. मथुरा येथील "रिअल इंटरनॅशनल स्कूल"च्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देशभरातील १० राज्यांच्या संघांनी आपला सहभाग नोंदवला होता. बास्केटबॉल, नेटबॉल आणि व्हॉलीबॉल या खेळांचे मिश्रण असलेल्या या नाविन्यपूर्ण "ड्रिपबॉल" खेळात महाराष्ट्राच्या संघाने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखले आणि अंतिम फेरीत विजय मिळवून "नॅशनल चॅम्पियन" होण्याचा मान मिळवला.

### खरेदी-विक्री हंगामाचा शुभारंभ

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजगुरुनगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्डमध्ये नवीन हंगामातील कांदा व बटाटा खरेदी-विक्री व्यवहाराचा शुभारंभ सभापती अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील यांच्या हस्ते गुरुवारी (दि. 1) पार पडला. राजगुरुनगर बाजार आवारात कांदा व बटाटा खरेदी-विक्रीचे हे दुसरे वर्ष असून, शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढला असल्याचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी सांगितले. या वेळी उपसभापती क्रांतीताई सोमवंशी, संचालक अशोक राक्षे, जयसिंग भोगाडे यांच्यासह इतर संचालक, शेतकरी, आडते, हमाल, मापाडी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सासवड नगरपरिषदेवर 'काकी'राज

## सासवड नगरपरिषदेला नवे नेतृत्व; विकासाचा वेग वाढवण्याचा निर्धार

- नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी पदभार स्वीकारला
- केंद्र–राज्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

**कार्यक्रमाच्या शेवटी माजी उपनगराध्यक्ष संजय ग. जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. पदभार स्वीकारल्यानंतर नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून सासवडच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

**सासवड (दै. आरंभ पर्व)**

सासवड नगरपरिषदेला नवे नेतृत्व मिळाले असून नवनिर्वाचित नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदुकाका जगताप यांनी शुक्रवारी पदभार स्वीकारला. नागरिकांनी दिलेल्या विश्वासाला न्याय देत शहराचा सर्वांगीण आणि संतुलित विकास साधण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र व राज्य शासनाच्या जनहिताच्या योजना प्रभावीपणे राबवून पायाभूत सुविधा, सुशोभीकरण आणि नागरी सोयी-सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला.

नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष दालनात



पार पडलेल्या या सोहळ्यात मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी नगराध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पदभार स्वीकारताना आनंदीकाकी जगताप म्हणाल्या की, "सासवडकरांनी दिलेली जबाबदारी ही केवळ सन्मान नसून मोठी जबाबदारी आहे. सर्व नवनिर्वाचित सदस्यांना सोबत घेऊन नियोजनबद्ध विकास केला जाईल. माजी आमदार संजय जगताप यांच्या दूरदृष्टीतून शहराच्या विकासकामांना दिशा दिली जाईल." या प्रसंगी माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, भाजप जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, शहराध्यक्ष आनंद जगताप, सत्ताधारी गटनेते अजित जगताप यांच्यासह नगरपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य, माजी पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे यांनी सांगितले की, "दिवंगत लोकनेते चंदुकाका जगताप यांनी घालून दिलेला विकासाचा पाया मागील पाच वर्षांत भक्कम करण्यात आला. त्या काळात संजय जगताप यांच्या मार्गदर्शनासोबतच आनंदीकाकी जगताप यांची गटनेत्या म्हणून महत्त्वाची भूमिका राहिली. आता त्यांच्या नेतृत्वाखाली सासवडचा विकास अधिक गतीने पुढे जाईल." भाजप जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे यांनी जनतेचे आभार मानत जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील, असा विश्वास व्यक्त केला. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा, महिला व युवकांसाठी विशेष उपक्रम, तसेच शहर सुशोभीकरणावर भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# पुण्यात भाजपचा श्रीगणेशा!

## प्रभाग ३५ मध्ये दोन उमेदवार बिनविरोध विजयी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड येथील प्रभाग क्रमांक 35 मध्ये अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी क आणि ड गटातील अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी माघार घेतल्याने भारतीय जनता पक्षाचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे ब गटातून मंजुषा नागपुरे आणि ड गटातून श्रीकांत जगताप बिनविरोध विजयी झाले आहेत.

उर्वरित दोन उमेदवारांपैकी ज्योती गोसावी यांच्या विरोधात उबाठा च्या नयना हनमघर, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) अडव्होकेट हर्षदा गायकवाड असे दोन उमेदवार तर सचिन मोरे यांच्या विरोधात कॉंग्रेसचे धनंजय पाटील रिंगणात आहेत.

प्रभाग ३५ ब सर्व साधारण महिला या गटातून मंजुषा दीपक नागपुरे या बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यांच्या विरोधातील अयोध्या शशिकांत पासलकर आणि पल्लवी पासलकर, तृप्ती काळोखे यांनी अर्ज माघारी घेतला.


प्रभाग ३५ ड सर्व साधारण या



गटातून श्रीकांत शशिकांत जगताप हे देखील बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यांच्या विरोधातील त्यांच्याच पक्षातील माजी नगरसेवक विकास दांगट यांनी पक्षादेशानुसार अर्ज माघारी घेतला तसेच समीर रुपदे, आश्विन शिंदे, भरत भुरट यांनी अर्ज माघारी घेतला. अखेर नितीन गायकवाड यांनी देखील अर्ज माघारी घेतल्या श्रीकांत जगताप बिनविरोध निवडून आले. दोन उमेदवार बिनविरोध निवडून येण्यासाठी विकास दांगट यांनी सूत्र हलविल्यांचे बोलले जात आहे.

दोन उमेदवार बिनविरोध झाल्याने आता केवळ अ गट नांगरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) आणि क गटासाठी निवडणूक होणार आहे. अ गटात तीन उमेदवार असून क गटात दोन उमेदवार आहे 35 या प्रभागात एकूण 13 उमेदवारांनी माघार घेतली. मंजूषा नगपुरे आणि श्रीकांत जगताप यापूर्वी २०१२, २०१७ आणि २०२६ असे तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांच्या बिनविरोध निवडून येण्याने भारतीय जनता पक्षाने पुण्यात ऐतिहासिक विजय मिळवला असून आपले खाते उघडले आहे.

**महापालिका निवडणुकीत काही पक्षांनी थेट गुन्हेगारांच्या कुटुंबीयांना उमेदवारी दिली आहे. पालकमंत्री म्हणतात, शहरातील गुन्हेगारी संपली पाहिजे. मात्र, त्यांची उमेदवारी यादी पाहिली तर ती कोणत्या तत्त्वात हे बसते, त्यांनीच सांगावे. गुन्हेगारांना राजकारणात स्थान नसावे. दुसऱ्या पक्षाने गुन्हेगारांना उमेदवारी दिली. परंतु आम्ही दिली नाही. पुणेकर पाहत आहेत की, नेमकी कोणाला उमेदवारी दिली गेली आहे. मतपेटीमधून त्याचे उत्तर मतदार देतील, असे म्हणत केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अप्रत्यक्षरीत्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाना साधला. पुणे शहर भाजप माध्यम कक्षाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि महाराष्ट्र प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले.**



# नगरसेवकांनो, या प्रश्नांची जाण आहे?

महाराष्ट्रात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. चांगली शहरे आणि नागरिकांचे उत्तम आरोग्य हे कुठल्याही देशात चांगल्या अर्थ-राजकारणाचे फलित असते. महाराष्ट्रात सुमारे ५०-६० टक्के नागरी वस्ती आहे; परंतु आरोग्यसेवेचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.

१. मनुष्यबळाचा अभाव, सोयी-साधने कमी आणि एकूण अव्यवस्था असल्यामुळे फक्त गरीबवर्ग मनपाच्या दवाखान्यांचा थोडाफार उपयोग करून घेतो आणि इतर नागरिक मात्र खासगी सेवांकडे जातात. हे काहीअंशी तरी बदलले पाहिजे. शहरी दवाखाने आणि रुग्णालये राष्ट्रीय मानकांनुसार सुधारणे आवश्यक आहे. अर्थपुरवठा, मनुष्यबळ, प्रशासकीय अडचणी यावर मात केल्याशिवाय पर्याय निघणार नाही. केंद्र सरकारच्या नागरी आरोग्य योजनेअंतर्गत सुरू झालेली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्येही अपेक्षित काम होत नाही. प्राथमिक सेवांपासून रुग्णालय व्यवस्था सुधारून मध्यमवर्गाने देखील इथे सेवा घेणे हा निकष धरला पाहिजे.

२. केंद्र शासनाच्या नागरी आरोग्य योजनेमध्ये सर्व सांसर्गिक आणि असांसर्गिक आजार नियंत्रण योजना, माता-बाल आरोग्य, लसीकरण इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी येतात. क्षयरोग, अतिसार, कावीळ आणि डास-रोग म्हणजे मुख्यत: डेंगू व चिकुनगुण्या आणि तापाच्या साथी ही महत्त्वाची आव्हाने आहेत. याचबरोबर अतिरक्तदाब, हृदयविकार, कर्करोग, मधुमेह, दमा, हे दीर्घकालीन घातक आजार मोठ्या प्रमाणात असतात; त्यांचे सर्वेक्षण चालू असते. या सगळ्यांना आरोग्यवर्धिनी/प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि पालिका रुग्णालयात विनाशुल्क उपचार अपेक्षित आहेत.

नि दान ज्येष्ठ नागरिकांचा या आजारांवरचा मोठा खर्च वाचू शकतो. याशिवाय घरभेटी आणि संपर्कासाठी आशा उपलब्ध आहेत, आणि त्यांच्या नव्या नेमणूक होत आहेत, या सर्व व्यवस्थेचा चांगला उपयोग होणे आवश्यक आहे.

३. शालेय आरोग्य योजनेत मुले आणि किशोरवयीन मुलांसाठी शिक्षण खाते, आरोग्यखाते आणि महिला बालकल्याण यांच्यामार्फत संयुक्तरीत्या योजना चालू आहेत; परंतु बऱ्याच शाळांमध्ये स्वच्छतागृहेदेखील धड नाहीत. माध्यान्ह भोजनाचा पोषक दर्जा सुमार आहे.

४. स्वच्छ भारत योजना आणि पिण्याचे सुरक्षित पाणी याबद्दल काही प्रगती झालेली आहे. तथापि, सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या लोकसंख्येच्या मानाने अल्प आहे. शहराच्या सीमांवर जास्त घाण आणि कचरा विखुरलेला दिसतो. महाराष्ट्रात बहुतेक शहरी नद्या आठ महिने बहुधा सांडपाणी वाहतात.

५. अन्नभेसळ प्रतिबंध कार्यक्रमात अन्न-निरीक्षक अधिकाऱ्यांची संख्याही कमी असते. हॉटेल्स आणि उपाहारगृहांबरोबरच खाद्यपदार्थ विकणाऱ्या हातगाड्यांचे समाधानकारक नियंत्रण अपेक्षित आहे.

६. मनपा क्षेत्रामध्ये ६०-७० टक्के वैद्यकीय सेवा खासगी क्षेत्रात असतात आणि त्यांच्या नियंत्रणासाठी बॉम्बे नर्सिंग होम रेगुलेशन ॲक्ट आहे. त्याचे उपनियम २०२१ मध्ये झाले आहेत. मेडिकल असोसिएशन आणि इतर संस्थांच्या मदतीने याबद्दल योग्य समन्वय करून नियम पारदर्शकपणे पाळण्याचा आग्रह दोन्ही बाजूंनी धरायला हवा. धर्मादाय रुग्णालयांना नियमावली आहे, त्यासाठी देखरेख आणि मार्गदर्शन हवे.

७. हवा-प्रदूषण ही नवीन समस्या अनेक शहरांना भेडसावत आहे. त्याचे मुख्य कारण वाढणारी वाहने. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या साहाय्याने पारदर्शकपणे यावर काम होणे अपेक्षित आहे.

८. नागरिकांचे आरोग्यवर्धन करणे एक महत्त्वाचे काम आहे. यासाठी चांगले हवा-पाणी, वाहतूक शिस्त, शालेय आरोग्य, नागरिकांना व्यायामाच्या सोयी, मुलांना खेळांच्या सोयी याबद्दल जागरूकता आणि अनेक आघाड्यांवर काम करावे लागते. यावर आज मनपाचा संस्थात्मक म्हणून फारसा प्रभाव नाही.

९. मनपाकडे जन्म-मृत्यू, शालेय आरोग्य तपासणी आणि इतर आजार-नियंत्रण या कार्यक्रमांमधून अनेकविध आरोग्य डेटा/विदा उपलब्ध होत असतो. प्रत्येक मनपाने यात लक्ष घालून आरोग्य विदा-संशोधन केंद्र तयार करून त्या आकडेवारीचा तात्काळ (रियल टाइम) उपयोग करून आरोग्य-वैद्यकीय व्यवस्थेला दिशा देण्याचा प्रयत्न करायला हवा.

१०. आज नगरसेवक निवडीनंतर व कमिट्या बनल्यानंतर आरोग्य आणि वैद्यकीय व्यवस्थेकडे फार तपशीलवार लक्ष जात नाही. नागरिकांचा आवाज देखील क्षीण आणि असंघटित असतो.

गैरकारभार आणि भ्रष्टाचार ही भारतातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रमुख समस्या झाली आहे. त्याचे सोपे उत्तर नाही याची मला जाणीव आहे. तथापि, निवृत्त ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर्स आणि समाजातील इतर घटक सर्वांनी संघटितपणे यात लक्ष घालायला हवे, जिथे यश संभवते, असे मुद्दे सुरुवातीस निवडायला हवेत. अन्यथा, नागरी आरोग्याचा प्रश्न जास्तच विस्कळीत आणि विदारक होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे




### भाजपचा स्नेह मेळावा उत्साहात साजरा; कार्यक्रम सर्वस्वी यशस्वी

खानापूर-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : ४२ गट खानापूर–खेडशिवापूर गट/गण भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कौटुंबिक व आप्तेष्ट स्नेह मेळावा गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी मातोश्री मंगल कार्यालय, खानापूर येथे प्रचंड उत्साहात पार पडला. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला आघाडीची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभल्याने संपूर्ण परिसरात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडलेला हा मेळावा सर्वस्वी यशस्वी ठरला. या स्नेह मेळाव्यास मा. आमदार भीमराव अण्णा तापकीर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शरद (लालाशेठ) जावळकर यांचीही प्रभावी उपस्थिती होती. तसेच सारिका सचिन पायगुडे, मेघा दाभेकर, अनिता तानाजी थोपटे, संतोषी अनिल दारवटकर, सोनम संतोष वरपे, ताराबाई नानगुडे आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले. मार्गदर्शन करताना आमदार भीमराव अण्णा तापकीर म्हणाले — “भाजपची खरी ताकद ही संघटनात आहे. कार्यकर्ता केंद्रस्थानी ठेवून विकासाची कामे मार्गी लावली जात आहेत. खानापूर–खेडशिवापूर परिसरात विकासाचा वेग अधिक वाढवण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे.” यावेळी बोलताना शरद (लालाशेठ) जावळकर यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित करत सांगितले — “जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा हीच आमची खरी संपत्ती आहे. ४२ गट खानापूर–खेडशिवापूर गणात भाजप अधिक मजबूत करण्याचा संकल्प या स्नेह मेळाव्यातून घेतला आहे.” मेळाव्यात संघटन बळकटीकरण, स्थानिक विकासकामांचा आढावा तसेच आगामी काळातील राजकीय रणनीतीवर सखोल चर्चा करण्यात आली. महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उल्लेखनीय उपस्थिती हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. घोषणाबाजी व उत्साहाच्या वातावरणात हा स्नेह मेळावा दिमाखात पार पडला.

### एकदिवसीय कृष्णाई वॉटर पार्क सहलीचे आयोजन




डोणजे-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : आपल्या भागाच्या पुणे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती पूजाताई पारगे व नवनाथदादा पारगे युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कृष्णाई वॉटर पार्क सहल आयोजित करण्यात आली आहे. सदर सहल शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ही सहल डोणजे – सिंहगड पायथा येथील कृष्णाई वॉटर पार्क येथे होणार असून सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लहान मुले, महिला, युवक व कुटुंबीयांसाठी पाण्यातील खेळ, करमणूक, विश्रांती व आनंददायी वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी या सहलीच्या माध्यमातून मिळणार आहे. टप्पा क्रमांक २ अंतर्गत समाविष्ट गावे : गोऱ्हे बु., डोणजे, गोहे खुर्द, खानापूर, मणेरवाडी, घेरा सिंहगड (आतकरवाडी, सांबरेवाडी, थोपटेवाडी), खामगांव मावळ, मालखेड, वरदाडे सोनापूर व आंबी या गावांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात पर्यटन, मनोरंजन व सामाजिक सलोखा वाढविण्याच्या उद्देशाने ही सहल आयोजित करण्यात आली असून नवनाथदादा पारगे युवा मंच सातत्याने सामाजिक, सांस्कृतिक व युवकांसाठी उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमासाठी नवनाथदादा पारगे युवा मंच व श्री. नरवीर तानाजी तरुण मित्र मंडळ, डोणजे हे आयोजक असून जास्तीत जास्त नागरिकांनी या सहलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### दुकान खरेदीच्या बहाण्याने महिलेची १२ लाखांची फसवणूक

पुणे (आरंभ पर्व) : दुकान खरेदीच्या बहाण्याने पुण्यातील एका महिलेची तब्बल 12 लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संबंधित महिलेने सांगवी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, काका आणि चुलतभावानेच विश्वासाचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. नवी सांगवी परिसरात राहणाऱ्या संगीता राम कांबळे (वय 55) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा चुलत भाऊ सचिन चंद्रकांत प्रभाळे (रा. शुक्रवार पेठ, पुणे) आणि चुलते चंद्रकांत प्रभाळे (रा. गुरुवार पेठ, पुणे) यांनी दुकान विक्रीच्या व्यवहारात त्यांची आर्थिक फसवणूक केली. शुक्रवार पेठ येथील एक दुकान खरेदी करण्याचा प्रस्ताव आरोपींनी मांडला होता.




## सुरक्षीत सेवा हे एसटी बस चालकांचे आद्यकर्तव्य

### आगारव्यवस्थापक विद्या कदम

राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

सुरक्षीत सेवा आणि विनाअपघात कामगिरी हे एसटी बस चालकांचे आद्यकर्तव्य आहे. असे मत येथील राजगुरुनगर एसटी आगाराच्या वरीष्ठ आगारव्यवस्थापक विद्या कदम यांनी येथे प्रतिपादन केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राजगुरुनगर एसटी आगारात आयोजीत सुरक्षितता अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपिठावर कनिष्ठ आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, आगार लेखाकार हिरामण दिघे, खेड तालुका पत्रकार संघाचे सचिव किरण खुडे, वाहतूक नियंत्रक विष्णू राठोड उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, अपघात माणसांकडून होतात. प्राणी, पक्षी यांच्याकडून कधीही अपघात होत नाही. म्हणजेच आपल्या कृतीवर प्राणी पुर्णतः केंद्रीत होऊन काम करत असतात. त्याचप्रमाणे वाहन चालविताना चालकाने कामावर पुर्णतः केंद्रीत होऊन काम केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊन आपण महामंडळाच्या व प्रवाशी जनतेच्या सेवेत आणखी लोकाभिमुख सेवा देऊ शकतो. राज्यातील अनेक आगारात अपघाताचे प्रमाण शुन्यावर आले आहे. ही गौरवास्पद गोष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.

उज्वला कुटे म्हणाल्या, ज्यावेळी एखादा अपघात होतो, त्यावेळी एखाद्या कुटुंबांची मोठी हानी होते. तरीही नाईलाजास्तव अशी घटना घडल्यास त्या कुटुंबांला भरपाई द्यावीच लागते शिवाय संस्थेच्या प्रतिमेचेही नुकसान होते. यासाठी स्वयंशिस्त व जबाबदारी यांचे भान राखून कर्तव्य करावे.

किरण खुडे यांनी कर्मचाऱ्यांना निर्व्यसनी राहुन जननी जन्मभूमी प्रमाणे एसटी या आपल्या मातृसंस्थेची व प्रवाशांची प्रामाणिक सेवा करण्याविषयीचे आपल्या भाषणात सांगितले. तर हिरामण दिघे यांनी मानसिकता सकारात्मक असल्यास नित्य कर्तव्यात कर्मचारी प्रामाणिक राहतो असे सांगितले.

कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. उत्कृष्ट विनाअपघात कामगिरी करणाऱ्या चालकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद वर्ये यांनी केले. आभार विष्णू राठोड यांनी मानले.

कार्यक्रमासाठी लक्ष्मण वेट्टी, स्नेहा कातोरे, रोहीणी साबळे, स्वाती बिराजदार, पुष्पा चासकर, मनिषा सुतार, रंजना बिराजदार, विजया बगाटे, वाहतूक नियंत्रक गुलाब तिटकारे, बळीराम चव्हाण, राजेन्द्र नागरे आदी उपस्थित होते.

## भाजपकडून ॲड. प्रसन्नदादा जगताप मैदानात




पुणे (दै. आरंभ पर्व)

विश्रामबाग येथील क्षेत्रिय कार्यालयामध्ये ॲड.प्रसन्नदादा जगताप यांनी भारतीय जनता पार्टीकडून पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक २८ (जनता वसाहत, हिंगणे खुर्द व संलग्न भाग) सर्वसाधारण गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी हा अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी अर्ज दाखल करताना उत्साही वातावरण होते. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारत जगताप, संदीप परदेशी, राहुल जोशी, स्वामी शिराळे, किशोर कुलकर्णी, भाऊसाहेब निकम,नाना राऊत, रवींद्र चौधरी, राहुल जगताप, अथर्व जगताप, पप्पू मारणे, तानाजी पासलकर आदी मान्यवरांची उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना ॲड.प्रसन्नदादा जगताप यांनी प्रभाग क्रमांक २८ मधील चारही जागांवर भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक निवडून आणण्याचा ठाम विश्वास व्यक्त केला. पक्षाने दिलेली ही जबाबदारी आपण संधी म्हणून स्वीकारत असून, प्रभागाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधांची मजबुती आणि नागरिकांच्या प्रश्नांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

“या प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि युवकांसाठी संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येईल. विकासात्मक कामे वेगाने राबवून नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करू,” असेही ॲड .जगताप यांनी नमूद केले.


## ग्रामपंचायत, बोरिबेल ता, दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस 1 सन २०२५ /२०२६**

ग्रामपंचायत बोरिबेल, ता, दौंड, जि, पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत बोरिबेल, ता, दौंड, जि, पुणे ०३/०१/२०२६ ते दिनांक ०५/०१/२०२६ कलावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्विकारली जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी दिनांक | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हापरिषद प्राथमिक शाळा शिंगाडेवाडी सार्वजनिक शौचालय बांधणे. | ३०००००/- | ०३/०१/२०२६ ते ०५/०१/२०२६ | १००/- | सुट सु.बे.अ. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश/ डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ६) आपण तांत्रिक लीफाफा उघडण्यात येईल. सदर निविदेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणताही निविदा स्विकारनेचा अथवा नाकारनेचा सर्व अधिकारी ग्रामपंचायत बोरिबेल यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरी/-
ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत, बोरिबेल ता, दौंड, जि, पुणे

## ग्रामपंचायत स्वामी चिंचोली ता. दौंड जि. पुणे

**टेंडर नोटीस**

**निविदा सूचना क्र. १/२५-२६**

ग्रामपंचायत स्वामी चिंचोली तालुका दौंड यांचे कडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

लेखाशीर्ष : १५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौर दुहेरी पंप बसवणे. | ३१६७३८.०० | - | २००/- | ३ महिने | खुला |

टीप :
१) कोऱ्या निविदा मिळण्याचा कालावधी दिनांक ०३/०१/२०२६ सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, ठिकाणः ग्रामपंचायत कार्यालय स्वामी चिंचोली.
३) निविदा उघडण्याचा दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.
४) निविदा संदर्भातील अटी आणि शर्ती तसेच लिफाफा क्र. ०१ व ०२ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पाहावयास मिळेल.
५) निविदा मंजूर / नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांना राखून ठेवण्यात आला आहे.

स्वाक्षरी/-
ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रा. पं. स्वामी चिंचोली ता. दौंड

## ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५-२६**

ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदापद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक ०२.०१.२०२६ ते दिनांक ०८.०१.२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०२.०१.२०२६ ते दिनांक ०८.०१.२०२६ सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कुसेगाव येथे समाजमंदिर बांधणे | ७,००,०००/- | ०२.०१.२०२६ ते ०८.०१.२०२६ | २३६/- | ७,०००/- |

१) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कुसेगाव खाते क्र. ०४८००२५०००००१०६ (PDCC बँक शाखा पाटस) वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील.
३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.
४) इसारा रक्कम ग्रामपंचायत कुसेगाव ग्रामनिधी खाते ०४८००२५०००००१०६ (PDCC बँक शाखा पाटस) खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कुसेगाव यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरी/-
ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे

## ग्रामपंचायत कुरंगवडी, ता. भोर जि. पुणे

**जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस**

ग्रा.पं.कुरंगवडी, ता.भोर ,जि.पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.कुरंगवडी येथे अनु.जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत काम मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि. ०३.०१.२०२६ ते दि. १०.०१.२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अं. प. रक्कम/ साहित्य रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी. सहीत) | बयाना रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुरंगवडी रमाईनगर येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. | अनु.जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे. | ९,९९,९६०/- | ५९०/- | १००००/- | ६ महीने |

अटी व शर्ती -
१) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. कुरंगवडी कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. १२.०१.२०२६ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता ग्रा.पं.कुरंगवडी येथे पार पडेल.
३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी.प्रमाणपत्र झेरॉक्स व निविदा तसेच बयाणा रकमेचा डी.डी / धनादेश सरपंच, ग्रा.पं.कुरंगवडी यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत.
४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.
५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल.
६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग भोर यांचे राहिल.
७) साहीत्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल.
८) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.कुरंगवडी यांनी राखून ठेवला आहे.
९) अ.क्र.१ मधील नमूद कामाचे ९०% देयक जमा असल्याने काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत १०% रक्कम प्रस्तावाअंती नियमानुसार जमा झाल्यानंतरच अदा केली येईल.याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत कुरंगवडी, ता. भोर जि. पुणे




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६





# पुण्यात 'युती-आघाडी' कागदावरच

## धंगेकर विरुद्ध बिडकर हायव्होल्टेज सामना पुन्हा एकदा! २०१७ ची होणार का पुनरावृत्ती?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाचा गोंधळ कायम राहिल्याने यंदा पुण्यात अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजप आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना यांच्यातील युती अधिकृतरीत्या जाहीर न झाल्याने दोन्ही पक्षांचे उमेदवार आमने-सामने ठाकले आहेत. तर दुसरीकडे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही समझोता न झाल्याने पुण्यात 'घड्याळ' विरुद्ध 'तुतारी' असा थेट संघर्ष पाहायला मिळणार आहे.



पुण्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष प्रभाग क्रमांक 23 आणि 24 कडे लागले आहे. येथे शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर आणि भाजपचे गटनेते गणेश बिडकर यांच्यातील जुना संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे. रवींद्र धंगेकर यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर यांनी प्रभाग क्रमांक 23 मधून, तर मुलगा प्रणव धंगेकर याने प्रभाग क्रमांक 24 मधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

विशेष म्हणजे, 2017 मध्ये रवींद्र धंगेकर यांनी गणेश बिडकर यांचा पराभव केला होता. आता 2017 च्या त्या अटीतटीच्या लढतीची पुनरावृत्ती होणार असून, यावेळी गणेश बिडकर यांच्यासमोर रवींद्र धंगेकरांच्या पुत्राने, प्रणव धंगेकराने मोठे आव्हान उभे केले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र निवडणूक लढवणार असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला होता. मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळेच दिसत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने पुण्यात नक्की किती जागा लढवायच्या, हे शेवटपर्यंत गुलदस्त्यात राहिले. ज्येष्ठ नेते अंकुश काकडे यांनी 70 हून अधिक उमेदवारांना 'एबी' फॉर्म वाटल्याचे जाहीर केल्याने, दोन्ही राष्ट्रवादीमध्ये अनेक प्रभागांत मैत्रीपूर्ण लढती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### युती आणि आघाडी केवळ नावापुरतीच?

**भाजप आणि शिंदे गटातील जागावाटपाची चर्चा अर्जाच्या शेवटच्या मिनिटापर्यंत सुरूच राहिल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. जागावाटप न झाल्याने अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार मैदानात उतरवले आहेत. त्यामुळे कागदावर दिसणारी युती प्रत्यक्षात मैदानात कुठेही दिसून येत नाही. महायुती असो वा महाविकास आघाडी, दोन्ही बाजूंच्या जागावाटपाचा घोळ मिटला नसल्याने पुण्यात यंदा बहुरंगी आणि चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत.**




# आता कार्यकर्त्यांची वेळ आहे

## नेत्यांना जागेवर आणण्याची



### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**(दै. आरंभ पर्व)**

राजकारण हे लोकसेवेचे साधन आहे, सत्तेचे नव्हे. हा मंत्र शिकवणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच पक्ष उभे राहिले. परंतु आज चित्र उलटे झाले आहे.

निवडणूक आली की कार्यकर्त्यांची आठवण, निकाल लागला की कार्यकर्त्यांना विस्मरण. हीच खरी शोकांतिका. त्यामुळे आता कार्यकर्त्यांची वेळ आली आहे; नेत्यांना त्यांच्या जबाबदारीची आठवण करून देण्याची, त्यांना जागेवर आणण्याची.

**कार्यकर्ते: पक्षाचा कणा, पण कधी शेवटचा?**

गल्लोगल्ली पायपीट, घाम गाळून प्रचार, जनतेच्या तक्रारी ऐकून मार्ग काढणे. हे काम कार्यकर्ते करतात. मात्र निर्णय घेताना, उमेदवारी देताना, निधी वाटताना तेच कार्यकर्ते बाजूला पडतात. नेतृत्वाभोवती 'होकाराचे वर्तुळ' तयार होते आणि प्रामाणिक आवाज दाबला जातो. हा अन्याय केवळ व्यक्तीवर नाही; तो लोकशाहीवर आहे.

**संघटनाशक्तीचा पुनर्जन्म**

एकटा कार्यकर्ता दुर्लक्षित होऊ शकतो; संघटित कार्यकर्ता बदल घडवतो. बूथपासून शहरस्तरापर्यंत कार्यकर्त्यांनी संवादाचे, निर्णयात सहभागाचे आणि पारदर्शकतेचे ठोस नियम मागितले पाहिजेत. बैठका म्हणजे फक्त भाषण नव्हे; त्या उत्तरदायित्वाच्या असल्या पाहिजेत.

**'आयाराम' संस्कृतीला ठाम नकार**

सत्तेसाठी पक्षांतर करणाऱ्यांना रेड कार्पेट आणि वर्षानुवर्षे झटणाऱ्यांना उपेक्षा. ही संस्कृती पक्षांचा आत्मा पोखरते. कार्यकर्त्यांनी स्पष्ट भूमिका घ्यायला हवी: निष्ठेला प्राधान्य, संधीला न्याय. अन्यथा उद्या पक्ष उरेल, पण कार्यकर्ते राहणार नाहीत.

**नेतृत्व घडवण्याची जबाबदारीही कार्यकर्त्यांची**

नेते केवळ टीका करून बदलत नाहीत; पर्याय उभे करून बदलतात. स्वच्छ चारित्र्य, स्थानिक प्रश्नांची जाण आणि संवादकौशल्य असलेले नवे चेहरे पुढे आणा. प्रशिक्षण, अभ्यासगट, जनसंवाद. या मार्गांनी कार्यकर्तेच उद्याचे नेतृत्व घडवू शकतात.

आता वेळ आली आहे. नम्रतेने, पण ठामपणे बोलण्याची. सतरंज्या उचलण्यापुरते नव्हे, तर निर्णयाच्या टेबलावर बसण्याची. नेत्यांना जागेवर आणण्याची ही लढाई व्यक्तीविरोधी नाही; ती मूल्यांची आहे. कार्यकर्ते जागे झाले, तरच लोकशाही खऱ्या अर्थाने मजबूत होईल.

### नेतृत्वाला प्रश्न विचारण्याची हिंमत

- **कार्यकर्त्यांनी आता एकत्र येऊन प्रश्न विचारायला हवेत.**
- **उमेदवारी कोणत्या निकषांवर?**
- **स्थानिक काम करणाऱ्यांना संधी का नाही?**
- **पक्षनिष्ठेची किंमत फक्त पोस्टर लावण्यापुरतीच का?**
- **नेत्यांना जाब विचारणे म्हणजे बंडखोरी नव्हे; ती जबाबदारीची आठवण आहे.**

# मुकुंद वेताळवर कारवाई करा

- **स्वामीचिंचोली ग्रामस्थांची मागणी**

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली गावचे मुकुंद गोविंद वेताळ हे गेल्या अनेक वर्षापासून आमरण उपोषण करत गावाला तसेच प्रशासनाला वेठीस धरून गावाच्या विकासाला बाधा आणत आहे मुकुंद गोविंद वेताळ हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याच्यावर अनेक गुन्हे दौंड पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहेत, या मुकुंद वेताळ याने माजी सरपंच सिताराम ननवरे यांना अमानुष मारहाण केली होती तसेच दमदाटी करून गायरानाची जागा बळकवली आहे, स्वतःला लाभ मिळावा म्हणून गाणं गावातील अनेक विकास कामे अडवली आहेत, अनेकांना खोट्या अॅट्रॉसिटी सारख्या पुण्यात अडकवण्याच्या धमक्या सतत देत असतो, गावातील सोमनाथ वेताळ याचे घरकुलाचे पान कमावून त्याची जागा उपोषणाची भीती घालून शासनाची तसेच ग्रामपंचायतची दिशाभूल करत आला आहे, गावातील गायरान जमीन अंदाजे 100भाय 100 माझी असून त्या ठिकाणावरून लोकांना जाण्या येण्यापासून रोखत आला आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे



### गोपाळवाडी ग्रामस्थ व शिक्षकांचा उपक्रम कौतुकास्पद - अरुण मरभळ

**दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील आदर्श व तंटामुक्त गाव ग्रामपंचायत गोपाळवाडी यांच्यावतीने तसेच जि. प.शाळा गोपाळवाडी यांच्यावतीने 1 जानेवारी 2026 पासून अभ्यासाचा भोंगा हा उपक्रम सुरू करण्यात आला असून या उपक्रमाला दौंड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांनी भेट दिली, गोपाळवाडी ग्रामस्थ जिल्हा परिषद शाळा गोपाळवाडी या सर्व शिक्षकांचे कार्य हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी मत मांडले, यावेळी सरपंच स्वातीताई पवार,उपसरपंच मनिषा ताई भोसले, माजी सरपंच जयसिंग दादा दरेकर, माजी सरपंच वैशालीताई शिंदे, गोपाळवाडी गावचे महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, मा. चेअरमन शांताराम होले,मा. उपसरपंच सीमाताई बोरावके,महाराष्ट्र भूमीचे पत्रकार विठ्ठल होले, जि प शाळा चे मुख्याध्यापक गौतम कांबळे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड, राहुल शिंदे,विकास मिंड, रघु सूळ, कल्पेश लांडगे, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते, यावेळी गटविकास अधिकारी अरुण मरबळ यांचा सरपंच स्वातीताई पवार,व माजी सरपंच जयसिंग दादा दरेकर, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला, त्यावेळी या ठिकाणी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे गटविकास अधिकारी यांनी संवाद साधून मुलांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

### अभ्यासाच्या भोंगा उपक्रमाचे गटविकास अधिकाऱ्यांकडून कौतुक



**दौंड (आरंभ पर्व) : देऊळगाव राजे ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लागावी तसेच मोबाईल व टीव्हीच्या व्यसनापासून दूर राहता यावे, या उद्देशाने "अभ्यासाचा भोंगा" हा अभिनव उपक्रम गावात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. काल सायंकाळी ठीक ७ वाजता भोंगा वाजल्यानंतर गावातील सर्व विद्यार्थी अभ्यासाला बसल्याचे सकारात्मक चित्र दिसून आले. याचवेळी पंचायत समिती दौंड येथील अरुण मरभळ (गटविकास अधिकारी) व दिनेश अडसूळ (सहाय्यक गटविकास अधिकारी) यांनी गावात अचानक भेट देत विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पाहणी केली. विद्यार्थ्यांचा अभ्यासातील उत्साह पाहून दोन्ही अधिकाऱ्यांनी त्यांचे मनापासून कौतुक करत प्रोत्साहन दिले. यावेळी विद्यार्थ्यांशी व पालकांशी संवाद साधताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, अभ्यासाचा भोंगा हा उपक्रम काळाची गरज असून संपूर्ण गावकऱ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद निश्चितच प्रशंसनीय आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

# एबी फॉर्म व उमेदवारी नाकारल्याने सर्वच पक्षांत बंडखोरीची ठिणगी

## सांगा आमची चूक काय?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजकारणात कधी काय घडेल याचा नेम नाही, याचा प्रत्यय पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा आला आहे. यंदाच्या निवडणुकीत वरिष्ठ पातळीवर युती-आघाडीचा प्रयोग करण्यात आला; मात्र हा प्रयोग प्रत्यक्ष मैदानात कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांसाठी मोठा धक्का ठरल्याचे चित्र आहे.

बंडखोरी टाळण्यासाठी सर्वच प्रमुख पक्षांनी थेट एबी फॉर्म देण्याची घाई केली. विशेषतः भारतीय जनता पार्टीकडून काही निश्चित उमेदवारांना थेट फोन करून उमेदवारीची माहिती देण्यात आली. परिणामी अनेक वर्षे पक्षासाठी झटलेल्या इतर इच्छुक उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी पसरली. ही नाराजी इतकी टोकाला गेली की काहींनी थेट दुसऱ्या पक्षाचा रस्ता धरला.

"पक्षासाठी आयुष्य घालवलं, पण शेवटी डावलण्यात आलं," अशी भावना अनेक भाजप कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. ही परिस्थिती केवळ भाजपपुरती मर्यादित राहिली नसून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) मध्येही जवळपास असाच गोंधळ पाहायला मिळाला. एबी फॉर्म मिळवण्यासाठी अक्षरशः 'कोणाचाही फॉर्म जोडण्याचा' प्रकार घडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शिवसेना, काँग्रेस आणि युतीतील पक्षांनी शेवटच्या क्षणापर्यंत निर्णय रखडवल्याने अखेरच्या एक-दोन तासांत घाईघाईने एबी फॉर्म वाटप करण्यात आले. यामुळे काही ठिकाणी पक्षाचे अधिकृत सदस्य असलेल्या उमेदवारांनाच इतर पक्षांचे एबी फॉर्म देण्यात आल्याचे विचित्र चित्र निर्माण झाले.

या साऱ्या गोंधळात निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोठी कोंडी झाली. नाईलाजास्तव काहींना दुसऱ्या पक्षाचा एबी फॉर्म घ्यावा लागला. या घटनाक्रमाला काही जण उपहासाने "कभी खुशी कभी गम" तर काही "राजकीय थ्रिलर" असे संबोधत आहेत. एका हातात फॉर्म मिळाल्याचा आनंद, तर दुसऱ्या बाजूला स्वतःच्या पक्षाने डावलल्याची खोल खंत.



दरम्यान, शिवसेनेने काही ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने मतविभाजनाचा धोका अधिक वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका निवडणूक एकतर्फी न होता चुरशीची होणार, हे स्पष्ट झाले आहे.

या घडामोडींचा फटका भाजपला बसत असल्याचे बोलले जात असून राष्ट्रवादी काँग्रेसने अमोल बालवडकर, किरण बारटक्के, धनंजय जाधव, रुपेश घुले, बापूसाहेब पोकळे, व इतर आणि काही नगरसेवक यांच्यासारखे महत्त्वाचे मोहरे टिपल्याची चर्चा आहे.

काही कार्यकर्त्यांशी संपर्क साधला असता, आम्ही वाट पाहतोय; त्यानंतर योग्य दिशेने निर्णय घेऊ," असे सांगितले.

या साऱ्या पार्श्वभूमीवर एकच प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित होत आहे.

बरेच वर्षाच्या खंडानंतर होत असलेल्या होत असलेल्या या निवडणुकामुळे इच्छुकांची संख्या मोठी झाली . परिणामी उमेदवारांना एबी फॉर्म देतानाही स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रचंड विरोध झाले असल्याची चर्चा होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## ३ ते ९ जानेवारी रोजी ‘नेक्सस २०२६’ हा वार्षिक महोत्सव

पुणे (आरंभ पर्व) : महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमध्ये (बीएनसीए) ‘नेक्सस 2026’ हा सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा वार्षिक महोत्सव तीन ते नऊ जानेवारी 2026 दरम्यान आयोजित केला आहे. या महात्सवात विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, बुद्धीमत्ता आणि सहकार्याची भावना वृद्धिंगत व्हावी हा हेतू आहे. त्यासाठी यंदाची संकल्पना ‘सिनेव्हर्स’ ही असून सिनेजगतापासून प्रेरणा घेत बीएनसीएचा परिसर हा त्या दृष्टीने सांस्कृतिक अनुभूती देईल असा सजवण्यात आला आहे. या वार्षिक महोत्सवातील महत्त्वाच्या गोष्टींमध्ये फ्ली मार्केट उर्फ सिनेबाजार आयोजित केले असून ते फक्त 7 जानेवारी रोजी सर्वांसाठी सशुल्क खुले करण्यात आले आहे. त्यामध्ये 40 स्टॉल्स उभारण्यात आले असून त्यावर विविध प्रकारच्या कलात्मक वस्तू, हस्तकला, जीवनोपयोगी वस्तू, तांत्रिक उपकरणे, खाद्यपदार्थ आणि विद्यार्थिनींमधील उद्योजगतेच्या कौशल्यातून निर्माण झालेली उत्पादने ठेवण्यात येणार आहेत. या माध्यमातून एक जिवंत सामाजिक जाणीव निर्माण करत असतानाच महोत्सवात स्थानिकांच्या सक्रिय सहभागातून त्यांच्यातील सर्जनशीलता तसेच सांस्कृतिक आदान-प्रदानातील सुसंवाद हा या महोत्सवातला एक पैलू ठरणार आहे.

## लोणी काळभोरमध्ये बिबट्या; वासराचा फडशा; भीतीचे वातावरण

लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (आरंभ पर्व) : गोठ्यात दावणीला बांधलेल्या वासरावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना हवेली तालुक्यातील लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील बाजार मळा परिसरात बुधवार (३१ डिसेंबर) रोजी सकाळी उघडकीस आली आहे. यामध्ये वासराचा जागीच मृत्यू झाल्याने शेतकऱ्याचे ५९ हजारांपेक्षा जास्त रुपयांचे नुकसान झाले आहे. परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अमृत विठ्ठल काळभोर असे नुकसान झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. काळभोर हे शेतकरी असून त्यांचा बाजारमळा जिल्हा परिषद शाळेच्या जवळ गायींचा गोठा आहे. काळभोर यांनी नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री ५ गाई व ३ ते ४ महिन्यांचे १ वासरु गोठ्यात बांधले होती. रात्री दहा वाजता काळभोर कामे आटोपून घरी गेले होते. मंगळवारी रात्री बिबट्याने सुमारे सहा फुट भिंतीवरून गोठ्यात प्रवेश केला. आणि दावणीला बांधलेल्या वासरावर हल्ला केला. परंतु, दोरखंड जाड असल्याने तो तुटला नाही. परिणामी बिबट्याला वासरू घेऊन जाता आले नाही. परंतु या. हल्ल्यात वासरू जाग्यावरच मृत्युमुखी पडले. काळभोर हे बुधवारी सकाळी गोठ्यात गेले तेव्हा त्यांना सदर प्रकार निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ लोणी काळभोर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. बीट मार्शल महेंद्र अगळे व तुळशीदास जाधव हे त्वरित घटनास्थळी पोहोचले व या घटनेची माहिती त्वरित वनविभागाला दिली आहे. माहिती मिळताच लोणी काळभोरचे वनपरिमंडल अधिकारी प्रमोद रासकर, वनरक्षक अंकुश कचरे, वनमजूर तुळशीराम कोंढारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाहणी केली परंतु गोठ्यात सिमेंट कॉंक्रीटचा कोबा केला असल्याने बिबट्यांच्या पाऊलखुणा तेथे मिळून आल्या नाहीत.







# सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार : दोडके

### “काम म्हणजे सचिन दोडके” हा नागरिकांचा विश्वास, हीच मोठी पोचपावती : सचिन दोडके







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे पॉप्युलर नगर कॉलनीसह संपूर्ण प्रभाग क्रमांक ३२ मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांच्या मनात एक ओळख ठामपणे रुजली आहे .

**“काम म्हणजे सचिन दोडके!”**

ही ओळख कुणी प्रचारातून निर्माण केलेली नसून, नागरिकांनी स्वतःच्या अनुभवातून दिलेली ही विश्वासाची खरी पोचपावती असल्याचे मत भाजपचे उमेदवार सचिन शिवाजीराव दोडके यांनी व्यक्त केले.

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दैनिक आरंभपर्व, पुणे – ‘मिशन महानगरपालिका’ या सदरासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यात आला.

समस्या असो वा अडचण तात्काळ प्रतिसाद, मदतीसाठी सदैव उपलब्ध राहणे आणि विकासकामांमध्ये सातत्य राखणे, या कार्यपद्धतीमुळेच प्रभागातील जनता आजही आपल्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे, असा विश्वास सचिन दोडके यांनी व्यक्त केला.

गेल्या दोन कार्यकाळात त्यांनी प्रभागाचा चेहरामोहरा बदलणारे भरीव काम केले आहे. रस्त्यांचे डांबरीकरण, नवीन पाणीपुरवठा पाइपलाईन, ड्रेनेज सुधारणा, पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या समस्यांचे निराकरण, वाहतूक कोंडीवर उपाय, स्ट्रीटलाईट्स, उद्याने तसेच स्वच्छता उपक्रम या सर्व विकासकामांचा ठसा आजही प्रभागभर स्पष्टपणे दिसून येतो.

“एकच कॉल – प्रॉब्लेम सॉल” ही त्यांची कार्यशैली सामान्य नागरिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारी ठरली आहे.

या सर्व कामांमध्ये त्यांचे बंधू बाबू दोडके यांचाही मोलाचा सहभाग असून, दोघांनी मिळून सामाजिक कार्याचा एक मजबूत पाया उभा केला आहे.

तसेच प्रभागातील अनेक विकास प्रकल्पांना गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

संवादादरम्यान सचिन दोडके म्हणाले,“या भागाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलण्याचा माझा ठाम संकल्प आहे. नागरिकांचा विश्वास हीच माझी खरी ताकद आहे. सुरू केलेली विकासाची घोडदौड थांबणार नाही. वारजे पॉप्युलर नगर कॉलनीसह संपूर्ण प्रभागाच्या विकासासाठी मी सदैव सज्ज आहे. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली प्रभागाच्या विकासाची वाटचाल अशीच चालू राहील”

सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रालाही त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. लहान मुलांसाठी पतंग महोत्सव, खेळाडूंकरिता वारजे ऑलिम्पिक, तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग कायम राहिला आहे. स्वतः खेळाची आवड असल्याने क्रीडांगण, क्रीडा सुविधा आणि खेळाडूंसाठी त्यांनी नेहमीच आग्रही भूमिका घेतली.

नगरसेवक म्हणूनच नव्हे, तर अधिक मोठ्या क्षमतेने काम करून कर्तृत्वातून मोठेपण सिद्ध करणारा नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे.

वारजेतील सर्व्हिस रोडच्या कामासाठी त्यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा विशेष उल्लेखनीय ठरला आहे.

हीच जनभावना, अनुभवाची शिदोरी महानगरपालिका २०२६ च्या दिशेने सचिन दोडके यांना घेऊन जाते हे ही तेवढं खरंच आहे.

## किया इंडियाकडून ऑल-न्यू किया सेल्टोस लाँच

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

किया इंडियाने आज ऑल-न्यू किया सेल्टोसच्या किमतींची घोषणा केली, ज्यासह मिड-एसयूव्ही श्रेणीमध्ये आपले स्थान प्रबळ केले आहे आणि ग्राहकांना त्यांची आवडती एसयूव्ही 10.99* लाख रूपयांपासून (एक्स-शोरूम) सुरू होणाऱ्या किमतीमध्ये खरेदी करण्याची आकर्षक संधी दिली आहे.

अधिकाधिक ग्राहकांसाठी सेकंड-जनरेशन, अधिक मोठी, अधिक आकर्षक आणि अधिक प्रगत एसयूव्ही परवडणारी करत कियाने मापदंड उंचावत या श्रेणीला नव्या उंचीवर नेले आहे. ऑल-न्यू किया सेल्टोसने भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी



आणि एसयूव्ही ग्राहकांसाठी सर्वात परिपूर्ण व लक्षवेधक निवड म्हणून आपले स्थान अधिक प्रबळ केले आहे. या एसयूव्हीमध्ये ऐसपैस जागा, आकर्षक नवीन डिझाइन, सुरक्षितता व तंत्रज्ञान आहे, तसेच ही एसयूव्ही आकर्षक दरामध्ये येते. किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ग्वांगू ली म्हणाले, ऑल-न्यू किया सेल्टोस ब्रँड सेल्टोसच्या प्रबळ उत्क्रांतीची प्रतीक आहे.

## प्रभाग क्रमांक २० मध्ये भाजप पॅनलच्या प्रचाराचा जल्लोषात शुभारंभ

### शंकर महाराज मठ येथून भाजपाचा विजयाचा शंखनाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 20 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ बिबवेवाडी येथील शंकर महाराज मठ येथे उत्साहात पार पडला. मठ परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी प्रभाग क्रमांक 20 मधील भाजपचे उमेदवार राजेंद्र आबा शिळीमकर, तन्वीताई प्रशांत दिवेकर, मानसीताई मनोज देशपांडे आणि महेंद्र माणिकचंद सुंदेचा हे एकत्र उपस्थित होते.



प्रचाराच्या प्रारंभी सर्व उमेदवारांनी शंकर महाराज मठात दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली.

कार्यक्रमात बोलताना उमेदवारांनी प्रभागात मागील काळात करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा उल्लेख केला. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नागरी सुविधा आणि मूलभूत सोयी-सुविधांसाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे नागरिकांचा विश्वास दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

याच कामांच्या जोरावर आगामी काळात पुन्हा एकदा जनसेवेची संधी मिळेल, असा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला.

या निवडणुकीत प्रभागाचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचा निर्धार पॅनलने केला आहे.

प्रभाग क्रमांक 20 मधील मतदारांनी कमळ या चिन्हावर मतदान करून भाजप पॅनलला प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

एकजूट, उत्साह आणि सकारात्मक वातावरणात पार पडलेल्या या प्रचार शुभारंभामुळे प्रभाग क्रमांक 20 मधील निवडणूक प्रचाराला चांगलाच वेग मिळाल्याचे चित्र दिसून आले.

## प्रभाग ३४ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विजय निश्चित

### सौ. नेहा भूपेंद्र मोरे यांचा विश्वास

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ ब च्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सौ.नेहा भूपेंद्र मोरे यांनी माध्यमांशी संवाद साधत पक्षाच्या विजयाबाबत ठाम विश्वास व्यक्त केला.

प्रभागातील जनतेसाठी सातत्याने केलेल्या जनहितार्थ कामाच्या जोरावर राष्ट्रवादी कॉंग्रेस मोठ्या मताधिक्याने विजयी होईल, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

सौ.नेहा मोरे पुढे म्हणाल्या की, “प्रभागातील नागरिकांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. ही निवडणूक मी एकटी नव्हे, तर ‘आम्ही सर्व’ मिळून लढत आहोत. त्यामुळे विजय निश्चित आहे.”

यावेळी बोलताना श्री. भूपेंद्र मोरे यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली. प्रभागातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी वेळोवेळी प्रत्यक्ष धावून जाऊन केलेली कामे, विविध जनआंदोलने आणि लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी घेतलेली ठोस भूमिका यामुळे ही निवडणूक



राष्ट्रवादीसाठी सोपी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नेहा मोरे यांनी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांसाठी तसेच सामाजिक विकासासाठी राबवलेल्या उपक्रमांचा विशेष उल्लेख करण्यात आला. या कार्यामुळे त्यांच्या सामाजिक बांधिलकीची ओळख निर्माण झाली असून, महिलांमध्ये त्यांना मोठा पाठिंबा मिळत असल्याचे भूपेंद्र मोरे यांनी सांगितले.

प्रभाग क्रमांक ३४ मधील वाहतूक कोंडी, सार्वजनिक बागा व क्रीडांगणांची कमतरता अशा विविध मूलभूत समस्यांवर प्राधान्याने काम करण्याचा संकल्प यावेळी मोरे यांनी व्यक्त केला. “नागरिकांच्या गरजा ओळखून त्यावर ठोस उपाययोजना राबवणे हेच आमचे ध्येय आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया परीक्षा परिषदेकडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुसूत्र व्हावी, या उद्देशाने शासनाने पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीची जबाबदारी राज्य परीक्षा परिषदेकडे देण्याचा नुकताच निर्णय घेतला. मात्र, या निर्णयावरून सरकारच्याच धोरणांमध्ये मोठा विरोधाभास निर्माण झाल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे. एकीकडे शासन म्हणते की, शिक्षण आयुक्तांवर कामांचा प्रचंड ताण आहे, त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येत आहेत. म्हणूनच, शिक्षक भरतीसारखी महत्त्वाची जबाबदारी परीक्षा परिषदेकडे सोपवण्यात आली. पण दुसरीकडे, याच प्रक्रियेसाठी स्थापन करण्यात आलेल्या ‘सुकाणू समिती’चे अध्यक्षपद शिक्षण आयुक्तांकडेच देण्यात आले आहे.

त्यामुळे खरा प्रश्न उपस्थित होतो की, जर शेवटी निर्णय आयुक्तच घेणार असतील, तर परीक्षा परिषदेकडे जबाबदारी देण्याचा अर्थ काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या निर्णयाला अनेक शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

## पाच जणांनी दगडाने व लोखंडी रॉडने मारहाण करून केला खून

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

फुरसुंगी पोलीस ठाण्याचे हद्दीत जुन्या वादाच्या कारणावरून पाच जणांनी एकाच्या डोक्यात दगडाने व लोखंडी रॉडने मारहाण करून जिवे ठार मारले आहे. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये एका विधी संघर्ष बालकाचा समावेश आहे.

फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेत प्रसाद वीरभद्र देवज्ञ (वय २१ रा. चिखले यांचा वाडा, नंदुरवेस गल्ली, परळी वैजनाथ, जिल्हा बीड) या तरुणाचा खून झाला आहे. या प्रकरणी राहुल राजेंद्र सुतार (वय २५, रा. संतोषी माता कॉलनी लेन नंबर ३ ड्रीम्स आकृती काळेपडळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण भैरू चव्हाण (वय ३८), रोहित भरत गायकवाड (वय १९, दोघे रा. लेन नंबर १७, संकेत विहार, फुरसुंगी, पुणे) व १७ वर्षे वयाच्या एका विधी संघर्ष बालकास अटक करण्यात आली आहे.

या घटनेची सविस्तर हकिकत अशी की ३० डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारांस परी सुपर मार्केट संतोषी माता कॉलनी, लेन नंबर ३, ड्रीम आकृती, काळेपडळ, पुणे येथे यातील आरोपी किरण भैरू चव्हाण, टिल्लू मिसाळ, आदित्य देशमुख, रोहित गायकवाड, व टिल्लू मिसाळ यांचा मित्र गणेश (त्याचे नाव पूर्ण माहित नाही) यांनी जुन्या वादाच्या कारणावरून प्रसाद वीरभद्र देवज्ञ याला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने बांबूने मारहाण करून जबरदस्तीने टिल्लू मिसाळ याच्या गाडीत बसून त्याला संकेत विहार लेन नंबर १६, फुरसुंगी येथील गणपतीच्या मंदिराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत नेऊन त्याच्या डोक्यात दगडाने व लोखंडी रोडने मारहाण केली. या मारहाणीत प्रसाद गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले.परतु डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर तो मयत झाला असल्याचे जाहीर केले.

## प्रभाग क्रमांक ३३ मध्ये राष्ट्रवादीची मोठी खेळी

### रुपेश घुले पाटील आणि संदीप मते यांच्या तुतारी प्रवेशाने मोठी चुरस

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 33 (खडकवासला–शिवणे–धायरी परिसर) मध्ये राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. दीर्घ चर्चेनंतर हा प्रभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) यांना सोडण्यात आल्यानंतर अवघ्या काही वेळातच अनपेक्षित घडामोडींनी या प्रभागातील राजकीय समीकरणे पूर्णतः बदलून टाकली आहेत.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रभावी नेते संदीप पाटीलबुवा मते यांनी थेट राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाचा एबी फॉर्म भरून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या या निर्णयामुळे प्रभागातील लढतीला नवे वळण मिळाले असून, स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे.



त्याचवेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसने टाकलेली सर्वात मोठी आणि धक्कादायक खेळी म्हणजे भाजपचे प्रस्थापित व प्रभावी नेते रुपेश घुले पाटील यांना आपल्या गळाला लावणे होय. दीर्घकाळ भाजपमध्ये संघटन मजबूत करणारे, कार्यकर्त्यांचा मोठा जनाधार असलेले रुपेश घुले पाटील हे नावच प्रभागातील राजकारणात वजनदार मानले जाते. त्यांच्या पत्नी रश्मी रुपेश घुले यांना ओबीसी प्रवर्गातून उमेदवारी देत राष्ट्रवादीने भाजपसमोर थेट आव्हान उभे केले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून या प्रभागात काकासाहेब चव्हाण, अनिता इंगळे, संदीप मते आणि रश्मी घुले असा भक्कम आणि संतुलित पॅनल उभा राहिला आहे.

विशेषतः रुपेश घुले पाटील यांचे नेतृत्व कौशल्य, संघटनात्मक ताकद व जनाधार, तसेच संदीप मते यांची प्रभागातील प्रचंड क्रेझ पाहता, प्रभाग क्रमांक 33 ही यंदाच्या निवडणुकीतील सर्वात लक्षवेधी आणि निर्णायक लढत ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, शिवसेना सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीमध्ये आलेले संदीप मते तसेच भाजपा नेते रुपेश घुले पाटील यांचे विधानसभा अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी पक्षात जाहीर स्वागत केले.

“प्रभाग क्रमांक 33 मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवेल,” असा ठाम विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### एसबीआय लाईफ आणि बीसीसीआय यांच्या तर्फे अभूतपूर्व संधी

पुणे (आरंभ पर्व) : आर्थिक संरक्षणापलीकडे जाऊन स्वप्नांना बळ देण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक दृढ करत भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह जीवन विमा कंपन्यांपैकी एक आणि बीसीसीआयची अधिकृत भागीदार असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने कोलकातास्थित उदयन एनजीओमधील पाच तरुण मुलींसाठी एका विशेष 'मीट अँड ग्रीट' कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमामुळे त्यांना विशाखापट्टणम येथील एसीए–व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियममध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सदस्यांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधण्याची दुर्मिळ आणि प्रेरणादायी संधी मिळाली. उदयन एनजीओमधील सुपर्णा महतो (9); एंजेल बौरी (10); रोशनी कर्मकार (10); मिनाती बास्के (10); अनुराधा मंडी (11) या पाच तरुण मुलींनी भारतीय महिला क्रिकेट संघातील हरमनप्रीत कौर, स्नेह राणा, शफाली वर्मा आणि हरलीन देओल यांसारख्या प्रसिद्ध खेळाडूंशी संवाद साधत अविस्मरणीय दिवस घालवला. एसबीआय लाईफ इन्शुरन्स आणि बीसीसीआय यांच्या वतीने आयोजित या 'मीट अँड ग्रीट' उपक्रमात या मुलींना भारतातील नामांकित महिला क्रिकेटपटूंसोबत सराव नेट्समध्ये उतरण्याचीही संधी मिळाली. हास्य, जल्लोष आणि मनमोकळ्या गप्पांनी भरलेला हा दिवस या मुलींसाठी खरोखरच संस्मरणीय ठरला. जागतिक दर्जाच्या खेळाडूंशी झालेल्या या संवादामुळे त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला असून, आत्मविश्वासाने आणि धैर्याने आपली स्वप्ने पूर्ण करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

### एलअँडटी फायनान्सकडून 'सचेत विथ सचेतचा शुभारंभ

L&T Finance

पुणे (आरंभ पर्व) : देशातील अग्रगण्य बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी एलअँडटी फायनान्स लिमिटेडने (पूर्वीची एलअँडटी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)'सचेत विथ सचेत या महत्त्वाकांक्षी सायबर सुरक्षा उपक्रमाची घोषणा केली आहे. हा उपक्रम वापरकर्त्यांना डिजिटल आर्थिक क्षेत्रात नेव्हिगेट करण्याकरिता साधने व माहितीसह सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. एलटीएफचा आर्थिक जागरूकतेचा प्रसार करणारा मस्कॉट 'सचेत कुमारचा ॲनिमेटेड अवतार असलेल्या या उपक्रमामध्ये परस्परसंवादात्मक तंत्रज्ञानासह गेमिफाईड माहितीचे संयोजन आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना नववर्ष 2026 साठी सुरक्षित डिजिटल सवयी अंगिकारण्यास मदत होईल. एलटीएफने Ltfsachet.in ही विशेष लिंक तयार केली आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार ओळखता येतील, त्यासंदर्भात पूर्वतयारी करता येईल आणि सुरक्षित राहता येईल. या पोर्टलचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'लिंक व्हेरिफिकेशन टूल, याद्वारे वापरकर्ते कोणतीही संशयास्पद वाटणारे यूआरएल (लिंक) सुरक्षित आहे की नाही, हे त्वरित तपासू शकतात. हे टूल गुगल सेफ ब्राउझिंग आणि 'ChatGPT API चा वापर करते, धोक्याची पातळी सोप्या रंग-संकेत प्रणालीद्वारे दर्शवते, ज्यामध्ये कोणतीही जोखीम नसलेल्या स्कॅमसाठी हिरवा, मध्यम धोका असलेल्या स्कॅमसाठी नारिंगी आणि उच्च जोखीम असलेल्या स्कॅमसाठी लाल रंगाचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, या प्लॅटफॉर्मवर यूपीआय सुरक्षा, डीपफेक, फिशिंग आणि आगाऊ शुल्क फसवणूक यांसारख्या गंभीर विषयांवर आधारित फसवणूकीबाबत जागरूकतेचा प्रसार करणाऱ्या गेमिफाईड प्रश्नमंजुषा उपलब्ध आहेत. या वास्तविक प्रसंगांवर आधारित आव्हानांमधून यशस्वीरीत्या मार्ग काढणाऱ्या वापरकर्त्यांना 'सचेत शील्ड हा डिजिटल बॅज देऊन'स्कॅम-स्मार्ट म्हणून गौरविण्यात येईल.



### फॉईड एक्सप्रेशन्सच्या मुंबई विभाग स्पर्धेत बीएनसीएला सुवर्ण पुरस्कार

पुणे (आरंभ पर्व) : फॉईड एक्सप्रेशन्स या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझाईन क्षेत्रातील मुंबई विभाग स्पर्धेत महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या (बीएनसीए) चार विद्यार्थिनींनींना सुवर्ण पुरस्कार मिळाला. त्यांनी या स्पर्धेत 'मानस : 'सूप्त मनाच्या लहरी' या अमूर्त विषयावर एक त्रिमिती आकृतीबंध साकार केला. बीएनसीएच्या पुरस्कारप्राप्त संघात मधुरा फडणीस, देवकी मंधाने, हरिता राघवेंद्रन आणि मोहिनी मांडके या विद्यार्थिनींचा समावेश असून त्यांना बीएनसीएच्या प्रा. अमृता बर्वे आणि प्रा. देवा प्रसाद यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी केले. यासंबंधी माहिती देताना प्रा. अमृता बर्वे म्हणाल्या की, या आकृतीबंधासाठी आम्ही चार फूट लांब, रुंद आणि आठ फूट उंचीचे मेटालिक (धातूचा परिणाम साधणारे) तीन पॅनल्स उभारले. त्याच्या मधल्या भागात पाणी भरलेल्या ट्रेखालून प्रकाशाच्या परावर्तनाच्या लहरी त्यावर सोडण्यात आल्या. यासाठी आम्हाला बीएनसीएच्या डिजिटल आर्किटेक्चर विभागाचे सहकार्य लाभले. यासंबंधी मधुरा फडणीस म्हणाली की, 'मानस' या आकृतीबंधातून मनाच्या सूप्त अदृश्य लहरी दाखवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्यामध्ये आकृतीबंधाखालील पाण्यातून परावर्तीत होणारा प्रकाश प्रतिसाद देणाऱ्या प्रतिकात्मक स्वरूपात दाखवण्यात आला आहे. तर आकृतीबंधातला बंदिस्त सेंद्रीय आकार हा त्यामधील अंतर्गत अशी न दिसणारी आवस्था असून त्यातून केवळ भावना या प्रकाश लहरींच्या अरुंद फटींमधून बाहेर पडताना ही सुप्त मनोवस्था जणू तुकड्या-तुकड्यांनी अभिव्यक्त होते. देवकी मंधाने म्हणाली की, आतील पाण्यावरील परावर्तीत प्रकाशकिरणे ही मनातील द्रव्यात्मक विचार व बदलत्या भावभावनांचे द्योतक म्हणून सूचीत केले आहे. विद्युत मोटारीतून पाण्यात तयार होणाऱ्या लहरींमुळे बदलत्या प्रकाशाचे विविध अमूर्त आकार तयार होतात. त्यातून निर्माण होणारी मनाची अस्वस्थता, त्याचे विविध थर आणि प्रमाणबद्ध नसलेल्या मनाच्या अव्यक्त आवस्था दर्शवतात.

## शांत स्वभाव, ठाम भूमिका आणि

# लोकांशी नातं जपणारा नेता : यशवंतबापू लायगुडे

**वाढदिवस विशेष**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजकारणात अनेक चेहरे दिसतात, पण काही माणसं पदामुळे नाही तर स्वभावामुळे लक्षात राहतात. धायरी–नऱ्हे–वडगाव परिसरात असेच एक नाव म्हणजे यशवंत लायगुडे (बापू). आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरात केवळ शुभेच्छांचा नाही, तर विश्वासाचा उत्सव साजरा होत आहे. यशवंत बापू यांचे नेतृत्व मोठ्या शब्दांवर नाही, तर छोट्या छोट्या कृतींवर उभे आहे. एखाद्या नागरिकाची अडचण असो, कार्यकर्त्याची गरज असो किंवा परिसराचा प्रश्न ते ऐकून घेणारे, समजून घेणारे आणि शक्य तेवढे तत्काळ मार्ग काढणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. म्हणूनच लोक त्यांना "नेता" म्हणण्यापेक्षा "आपला माणूस" म्हणतात.

चुलते माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी त्यांच्या सामाजिक राजकीय चळवळीस प्रारंभ केला.

पुढे पक्षात काही काळ काम केल्यानंतर मंडलाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांच्या कामात वेग आला, पण स्वभावात बदल झाला नाही.

सत्ता, पद किंवा प्रसिद्धी यापेक्षा संघटन, कार्यकर्ता आणि सामान्य नागरिक हेच केंद्रबिंदू ठेवून त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. रस्ते, पाणी, स्वच्छता, वाहतूक यांसारख्या रोजच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आणि पाठपुरावा केला. त्यामुळे त्यांच्या कामाचा ठसा हळूहळू पण खोलवर उमटत गेला.

तरुणाईशी त्यांचे नाते विशेष उल्लेखनीय आहे. युवकांना संधी देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि "तुमचंही नेतृत्व घडू शकतं" ही भावना रुजवणे—हे ते कृतीतून दाखवतात. क्रीडा महोत्सव, सामाजिक उपक्रम किंवा पक्षाचे कार्यक्रम असोत, युवकांना पुढे आणण्यात त्यांची भूमिका नेहमीच ठळक राहिली आहे.

"आमच्यापेक्षा पक्ष मोठा" ही भूमिका त्यांनी शब्दांत नाही, तर कृतीतून दाखवली. हीच गोष्ट त्यांना वेगळे आणि विश्वासार्ह बनवते. आगामी काळात पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 34,35 मोठा विजयी मिळवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केले आहे.. प्रभागातील परिसरातील जनतेच्या विकासासाठी नेहमी कटिबद्ध राहील अशी प्रतिक्रिया त्यांनी वाढदिवसानिमित्त व्यक्त केली.

आज त्यांच्या वाढदिवशी परिसरातील नागरिक एकच भावना व्यक्त करत आहेत. "बापू, तुम्ही असेच शांतपणे, प्रामाणिकपणे आणि लोकांसाठी उभे राहणारे राहा."

यशवंतबापू लायगुडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

जनतेचा विश्वास, कार्यकर्त्यांची साथ आणि सेवाभावाची ऊर्जा अशीच अखंड राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

## महाराष्ट्राला बेकायदेशीर स्थलांतरित विरोधात विशेष अधिकार द्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात वाढत्या बेकायदेशीर स्थलांतरितांची संख्या बघता केंद्र सरकारने सरकारने तात्काळ बेकायदेशीर स्थलांतरितांची हकालपट्टी करण्याकरता एक विशेष कायदा बनवावा. तसेच अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये देखील महाराष्ट्र शासनाला व प्रशासकीय अधिकाऱ्यांना विशेष अधिकार प्रदान करावेत अशी मागणी संस्थेने केलेली आहे. याकरता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी पत्र पाठवले आहेत अशी माहिती ॲड मंजिरी जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होतया. यावेळी अमेय सप्रे, ॲड. सर्वेश मेहेंदळे उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड मंजिरी जोशी म्हणाल्या, 'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशातील विविध राज्यांमध्ये शेकडो बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांना सीमा सुरक्षा दल (BSF) यांच्या ताब्यात देण्यात आले आणि त्यानंतर त्यांना त्यांच्या संबंधित देशांमध्ये परत पाठविण्यात आले. त्याचप्रमाणे, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, राज्य व केंद्र सरकारांनी संयुक्तपणे बेकायदेशीर स्थलांतराविरोधात व्यापक मोहिमा राबवल्या. या कारवायांदरम्यान आढळून आलेल्या कागदपत्रविहीन व्यक्तींची संख्या अत्यंत धक्कादायक होती व या समस्येची गंभीरता आणि तातडी स्पष्टपणे अधोरेखित झाली.

स्थलांतर व परकीय नागरिक कायदा, 2025 [Immigration And Foreigners Act 2025] हा सीमापार हालचाली नियंत्रित करणे व राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबी हाताळण्यासाठी तयार करण्यात आला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे हे त्यातील गुंतागुंतीच्या वेळखाऊ कायदेशीर प्रक्रियेमुळे शक्य नाही.

## प्रभागांमध्ये निवडणूक रणधुमाळीला सुरुवात

### महानगरपालिका निवडणुका चुरशीच्याच होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महानगरपालिका निवडणुकीसाठी अखेर सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांची घोषणा केल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण पूर्णतः तापले आहे. उमेदवारी जाहीर होताच आता निवडणूक प्रत्यक्ष सुरू झाली असून, प्रत्येक प्रभागात प्रचार, सभा, भेटीगाठी आणि मतदार संपर्काला वेग आला आहे.



उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी अनेक इच्छुकांनी जनसंपर्क वाढवणे, विकास कामांचे श्रेय मांडणे आणि पक्षांतर्गत जोरदार लॉबिंग केले होते. काहींनी मोठा खर्च करून तयारी केली होती. मात्र अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर काहींच्या पदरी आनंद पडला, तर काहींना निराशेचा सामना करावा लागला.

उमेदवारी न मिळालेल्या अनेक इच्छुकांमध्ये नाराजी उघडपणे दिसून आली. काही ठिकाणी बंडखोरीचे संकेत मिळाले, तर काही नेत्यांनी ऐनवेळी पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला. अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश झाल्याने राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत.

दरम्यान, ज्या उमेदवारांना तिकीट मिळाले आहे त्यांनी आता पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरले असून "जनसेवा, विकास आणि स्थिर नेतृत्व" हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून प्रचार सुरू केला आहे. प्रभागनिहाय रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, ड्रेनेज, आरोग्य सुविधा आणि मूलभूत नागरी प्रश्नांवर उमेदवार भर देताना दिसत आहेत.


या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये जुने प्रस्थापित चेहरे आणि नव्या नेतृत्वामध्ये थेट लढत होत आहे. काही ठिकाणी पक्षनिष्ठा टिकवून ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळाल्याचे समाधान व्यक्त होत असताना, तर काही ठिकाणी नव्या चेहऱ्यांना प्राधान्य दिल्याने अंतर्गत नाराजीही चर्चेचा विषय ठरत आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यामुळे आता राजकारणातून निवडणूक मोडमध्ये प्रवेश झाला असून, पुढील काही दिवसांत प्रचाराचा वेग आणखी वाढणार आहे. प्रचार सभा, रोड शो, घराघरांत भेटी आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याची स्पर्धा तीव्र होणार आहे.

यंदाची महानगरपालिका निवडणूक कोणत्या वळणावर जाईल, याचा अंदाज लावणे कठीण असले तरी उमेदवारी जाहीर झाल्याने राजकीय चित्र स्पष्ट होत असून, ही लढत अत्यंत चुरशीची ठरणार, हे मात्र निश्चित आहे.

## अन्न आणि औषधे विभागाच्या तोतयाला बेड्या

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



अन्न आणि औषधे विभागाचा निरीक्षक असल्याचे भासवून शहरातील औषध विक्री दुकानांची तपासणी करणारा, तसेच त्यातील दोष दाखवून कारवाईची धमकी देणारा आणि २० हजार रुपयांची मागणी करणाऱ्या तोतया निरीक्षकाला खेड पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी आनंद भुजंग (वय ३४, रा. सांगवी, पुणे) असे अटक करण्यात घेतलेल्या तोतया निरीक्षकाचे नाव आहे.

आकाश कोंडुसकर असे नाव सांगून अधिकारी असल्याचे भोसवत होता. मेडिकल संघटनेच्या सदस्य, दुकानदारांनी ही घटना उघडकीस आणली. या प्रकाराने शहरात खळबळ उडाली आहे. त्याच्याकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे बनावट ओळखपत्र मिळाले आहे.

याप्रकरणी खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाजवळ असलेल्या मेडिकल दुकानामध्ये हा बनावट अधिकारी आला. त्याने आपण अन्न आणि औषध विभागाचा वरिष्ठ निरीक्षक असल्याचे सांगितले. त्याने औषध विक्रेत्याकडे विविध चौकशा सुरू केल्या. त्यानंतर २० हजार रुपयांची थेट मागणी केली. यावर मेडिकल चालक तरुण चौधरी यांनी त्याचे आयकार्ड पाहण्यासाठी मागितले. त्यावर नेहमी येणाऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा नवीन वाटणारे नाव वाचून त्यांना शंका आली. त्यानंतर चौधरी यांनी संघटनेतील राजू चौधरी, नीलेश आरबुज व इतर सदस्यांशी संपर्क साधला. पदाधिकाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधला. त्यावेळी अशा नावाचा कोणीही अधिकारी आपल्या विभागात नसल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर या निरीक्षकाला थांबवून ठेवण्यात आले. मात्र, तोतयाला संशय आल्याने हा तोतया निरीक्षक तेथुन पुन्हा येतो, असे सांगून निघून गेला.

राजू चौधरी, नीलेश आरबुज व इतरांनी तो गेलेल्या मार्गावर त्याचा शोध घेतला असता, एका सीएनजी पंपावर हा तोतया त्याच्या वाहनाला गॅस भरून घेत असल्याचे दिसून आले. सगळ्यांनी त्याला घेरले. प्रश्नांची सरबत्ती केल्यावर तो गोंधळला. व जाण्याचा प्रयत्न करू लागला, मात्र मेडिकल संघटनेच्या सदस्यांनी त्याला पकडून खेड पोलिस ठाण्यात आणले.

काही दिवसांपूर्वी याच व्यक्तीने आळंदी परिसरात अशाच प्रकारे अनेक औषध दुकानदारांना अधिकारी असल्याचे सांगून लाखो रुपये लुबाडल्याचे मेडिकल संघटनेचे अध्यक्ष धनंजय गारगोटे यांनी सांगितले. राजू चौधरी, नीलेश आरबुज, नितीन पवळे, श्रीकांत आरुडे, मोहसीन आत्तार, केतन घोरपडे आदी मेडिकल संघटनेच्या सदस्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

तोतयेगिरी आणि त्याद्वारे फसवणूक करण्यावरून आनंद भुजंग याच्या विरोधात खेड पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले.

## परवानगी नाकारली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने (म्हाडा) विविध योजनांसाठी काढलेल्या सुमारे सव्वा चार हजार घरांची सोडतीला महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेचा फटका बसला असून सोडत काढण्यास राज्य निवडणूक आयोगाने अखेर परवानगी नाकारली आहे. या सोडतीतून होणाऱ्या घरांचे वाटप लकी ड्रॉ पद्धतीने केले जाणार असल्याने स्थानिक नागरिक प्रभावित होऊ शकतात, यासाठी ही सोडत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर जाहीर करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. या बाबत म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव यांनी आयोगाकडे परवानगी मागितली होती. आता ही सोडत फेब्रुवारीतच जाहीर होण्याची शक्यता आहे. म्हाडाने पुणे, पिंपरीसह सांगली व सोलापूर जिल्ह्यांत ४ हजार १६८ घरांची सोडत काढली आहे. या सोडतीसाठी २ लाख १५ हजार ८४७ अर्ज आले आहेत. पूर्वीच्या वेळापत्रकानुसार ही सोडत ११ डिसेंबरला काढण्यात येणार होती. मात्र, त्यानंतरही सोडत काढण्यात आली नाही. त्यानंतर म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव यांनी ही सोडत १६ किंवा १७ डिसेंबरला काढण्यात येईल असे सांगितले होते.



## सावित्रीमाईच्या शेकडो लेकींनी केला संविधानाचा जागर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अंगावर हिरवे इरकल, कपाळी आडवा गंध, हाती संविधान, ओठी सावित्री-ज्योतिचा जागर करत सावित्रीबाईंच्या पेहरावात अवतरलेल्या शेकडो लेकी, डोक्यावर फुले फेटा, अंगात कोट घालून महात्मा फुलेंच्या पेहरावात आलेले आयोजक विजय वडवेराव अन् सर्वांनी एकत्रितपणे केलेला संविधानाचा जागर, यामुळे संविधान कट्ट्यावर, सभागृहात जणू सावित्रीबाई, ज्योतिराव आल्याचे चित्र पाहायला मिळाले. भिडेवाडाकार फुलेप्रेमी कवी, संविधानदूत विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे उद्घाटन मान्यवर कवींच्या अध्यक्षतेखाली झाले. येत्या ५ जानेवारी २०२६ पर्यंत हा फुले फेस्टिव्हल नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात रंगणार असून, महाराष्ट्रासह देशविदेशातून ८०० कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत.

महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई व फातिमाबी शेख यांच्या वेशभूषेतील कवी-कवयित्रींनी सादर केलेल्या काव्यरचना, फुले दाम्पत्याचा गौरवपूर्ण उल्लेख, विचारांचा जागर, सावित्री-ज्योति यांच्यासह आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला.

# २० वर्ष भाजपसाठी काम केलं, तरीही मला का डावललं?

### संदीप पोकळे यांची आ. तापकीर यांच्यावर तीव्र नाराजी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



गेल्या दोन दशकांहून अधिक काळ भारतीय जनता पक्षासाठी निष्ठेने काम करूनही पक्षांतर्गत डावलल्याची भावना व्यक्त करत संदीप पोकळे यांनी आमदार तापकीर यांच्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

"तळागाळात संघटन मजबूत करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेतली, पण निर्णयाच्या वेळी मला बाजूला सारण्यात आलं," असा थेट आरोप पोकळे यांनी केला.

संदीप पोकळे म्हणाले की, भाजपच्या विविध आंदोलनांमध्ये, निवडणूक मोहिमांमध्ये आणि संघटनात्मक कामात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. मात्र, स्थानिक पातळीवरील नेतृत्वाकडून योग्य सन्मान व संधी न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढत आहे.

"कार्यकर्त्यांच्या भावनांकडे दुर्लक्ष केलं जात असल्यास ते पक्षाच्या भवितव्यासाठी घातक ठरू शकतं," असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, आगामी काळात प्रभाग क्रमांक ३३ मध्ये आपली ताकद दाखवून देणार असल्याचं ठाम संकेत पोकळे यांनी दिले आहेत. प्रभागातील जनतेशी थेट संवाद, विकासकामांचा आढावा आणि संघटन मजबूत करण्यावर भर देणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

"जनतेच्या विश्वासावर राजकारण उभं राहतं. तो विश्वास आमच्यासोबत आहे," असं ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना नवा वळण देत सौ. सीमा संदीप पोकळे या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेकडून प्रभाग क्रमांक ३३ मधून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवसेनेत प्रवेश करून स्थानिक विकास, महिला सक्षमीकरण आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी ठोस कार्यक्रम राबवणार असल्याचं पोकळे कुटुंबियांनी सांगितलं.

राजकीय वर्तुळात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून, प्रभाग क्रमांक ३३ मध्ये आगामी निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कार्यकर्ते, मतदार आणि स्थानिक नेत्यांच्या भूमिकेमुळे पुढील राजकीय समीकरणे कशी आकार घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.